महाराष्ट्र शासन
सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर
दुरध्वनी क्र. 0712-2557266/46
E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.in Website : www.rdtenagpur.org.in

क्र.तशिस/प्राकाना/शैवि-1/ 2020/ 1937 दिनांक:- 3 SEP 2020

तातडीचे

प्रति,

प्राचार्य/संचालक,
सर्व तंत्रनिकेतन (Polytechnic) पदवीका संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

विषय:- तांत्रिक पदवीका अभ्यासक्रमातील शासकीय/अशासकीय अनुदानित संस्था व विनाअनुदानित संस्थांमधील थेट व्दितीय वर्षाच्या प्रवेशासाठी रिक्त जागांबाबत

संदर्भ:- तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांची पत्र क्र. 10/एनजीसी/व्दि.व.रिक्त जागा/2020/629 दि. 03/09/2020

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपल्या तंत्रनिकेतनातील व्दितीय वर्ष पदवीका अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचे बदलीने स्थलांतरण झाल्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांची माहिती तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांच्या व्दितीय वर्ष पदवीका अभ्यासक्रमाच्या संकेतस्थळावर असलेल्या Vecancy Calculation Module मधून दि. 07/09/2020 पर्यंत online पध्दतीने अपडेट करावी.

**सहपत्र**:- संदर्भिय पत्र

(डॉ. राम निबुदे)
प्र. सहसंचालक
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४१०/४३०/४६५,
ई-मेल–desk10@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमां · १०/एनजीपी/द्वि.व.रिक्त जागा/२०२०/ ६२९ दिनांक : 03 SEP 2020

<u>तात्काळ/ईमेलव्दारे</u>

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपुर/नाशिक/पुणे.

विषय:-विविध तांत्रिक पदविका अभ्यासक्रमातील शासकीय, अशासकीय अनुदानीत संस्था, विद्यापीठ संचालित महाविद्यालये/विभाग व विनाअनुदानित संस्थांमधील थेट द्वितीय वर्षाच्या प्रवेशासाठी रिक्त जागांबाबत...

संदर्भ:- १) परिपत्रक क्र.१०/एनजीपी/वि.सं.ब./२०२०/४६२, दि.२८/७/२०२०
२) परिपत्रक क्र.१०/एनजीपी/वि.सं.ब./२०२०/४६३, दि.२८/७/२०२०
३) परिपत्रक क्र.१०/एनजीपी/शा.वि.सं.ब./२०२०/४६७, दि.२९/७/२०२०
४) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१५/प्र.क्र. २५२/तांशि-४ दि. ०५.०७.२०१८.
५) शासन निर्णय क्रमांक मान्यता-२०२०/(प्र.क्र.३९/२०)/तांशि-५ दि. २२.०७.२०२०.

उपरोक्त विषयास अनुसरुन नमुद करण्यात येते की, उपरोक्त संदर्भ क्र.४ वरील शासन निर्णयानुसार विविध तांत्रिक पदविका अभ्यासक्रमांची केंद्रिभूत प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. तसेच संदर्भ क्र.५ वरील शासन निर्णयान्वये पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेश नियमावलीस शासन मान्यता मिळालेली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमावलीनुसार द्वितीय अथवा तृतीय वर्ष पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थी संस्था बदल/संस्था बदलासह पाठयक्रम बदलाबाबत उपरोक्त संदर्भाधीन १ ते ३ वरील परिपत्रकान्वये सूचना दिलेल्या आहेत.

त्याअनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील सर्व तंत्रनिकेतनांच्या प्राचार्य / संचालक यांनी द्वितीय वर्ष पदविका अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचे बदलीने स्थलांतरण झाल्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांची माहिती संचालनालयाच्या थेट द्वितीय वर्ष पदविका अभ्यासक्रमाच्या संकेतस्थळावर असलेल्या Vacancy Calculation Module मधून दि.०७ सप्टेंबर २०२० पर्यंत आणि विभागीय कार्यालयांनी दि.०८ सप्टेंबर २०२० पर्यंत Online पध्दतीने अपडेट करावी.

(प्रमोद नाईक)
सहसंचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत:- माहिती व उचित कार्यवाहीसाठी रवाना.

१. कार्यासन क्रमांक ३, मुख्य कार्यालय, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदर पत्र या संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे. तसेच पुढील उचित कार्यवाहीसाठी.
२. प्राचार्य/संचालक, शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित पदविका अभ्यासक्रमाच्या तांत्रिक संस्था.

*E/Bhadekar/DSD Vacancy letter 20-21*